## पोस्टे नरखेड अंतर्गत मोहाड येथील महीलेच्या हत्या प्रकरणात
## स्थानिक गुन्हे शाखेने उकल करून २ फरार आरोपी केले अटक................

दिनांक १७/७/२३ ते १८/०७/२३ चे रात्री पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत येणा—या मोवाड येथे नगर परीषद कॉम्प्लेक्स जवळ आठवडी बाजार येथे मंजुषा आमटे या महीलेला कोणीतरी अज्ञात इसमाने जिवानीशी ठार मारून तिला बाजुला असलेल्या नालीचे चेंबरमध्ये टाकले. यावरून दिनांक १८/७/२०२३ रोजी पोलीस स्टेशन नरखेड येथे अपराध क्र २९५/२३ कलम ३०२,२०१ भादवि अंतर्गत दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयात स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने गुप्त माहीतीच्या आधारे दोन संशयीत युवकबाबत माहीती मिळाली कि, दोन युवक हे गावातुन मोटर सायकल चोरी करून नागपुर च्या दिशेने गेले आहे. सदर संशयीत आरोपीचा सीसीटिव्ही आणि तांत्रीकरीत्या शोध घेतला असता ते चोरी केलेल्या मोटर सायकलने वानाडोंगरी, हींगणा, आणि बुटटीबोरी हद्दीत गेल्याचे समजले. व पूढे रेल्वेने सेवाग्राम रेल्वे स्टेशन,व तेथुन हैद्राबादचे दिशेने गेल्याचे समजले. स्थानिक गुन्हे शाखेचे एक पथक तयार करून हैद्राबाद येथे पाठविण्यात आले. सदर पथकाने आरोपीचा हैद्राबाद येथे शोध घेतले असता आरोपी हे सिकंदराबाद रेल्वे स्थानकावरून जगतगिरी गुट्टा येथे असल्याची माहीती मिळाली. व तिथे एक दिवस थांबुन एक कंत्राटी ठेकेदारा मार्फत दोन्ही आरोपी जिल्हा हींगोली येथील शिरूड शहापुर येथे गेल्याबाबत समजले. तिथे जावुन परीसरात त्यांचा शोध केला असता दोन्ही आरोपी शिरूड शहापुर येथुन ताब्यात घेवुन त्यांचे नाव गाव, पत्ता विचारून गुन्हयाबाबत विचारपुस केली असता, त्यांनी सांगितले कि, मंदीर चोरी करतेवेळी सदर महीलेने चोरी करतांनी पाहील्यामुळे तिला ठार मारून मोटरसायकल चोरी करून पळुन गेल्याचे सांगितले.

**नाव आरोपी** :— १. हरीश रामदास क्षीरसागर वय २४ वर्ष रा मोवाड ता नरखेड जि नागपुर
२. शुभम बिंदे धुर्वे वय १९ वर्ष रा चांदगाव जि छिंदवाडा मध्यप्रदेश

**उघडकीस आलेले गुन्हे** :— पोलीस स्टेशन नरखेड अप क्र २९६/२३, कलम ३७९ भादवि
अप क २९७/२३ कलम ३७९,५११ भादवि

सदरची कारवाई मा. श्री विशाल आनंद (पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण), मा. श्री संदीप पखाले अपर पोलीस अधिक्षक, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, सपोनि राजीव कर्मलवार, अनिल राउत, आशिषसिंह ठाकुर, पोलीस उपनिरीक्षक श्री आशिष मोरखेडे, पोहवा ईकबाल शेख, पोशि राहुल साबळे, निलेश इंगुळकर, तसेच सायबर सेल चे पोना सतिश राठोड, कुणाल राउत, यांचे पथकाने केली आहे.

**(सदर कारवाईचा फोटो सोबत जोडला आहे.)**

# मंदीर चोरी करणारा आरोपी अवघ्या १२ तासाच्या आत अटकेत
# पोस्टे सावनेर येथील डि बी पथकाची कारवाई

दिनांक २६/०७/२३ रोजी पोलीस स्टेशन अप क्र ६६८/२३ कलम ४५४,४५७,३८० भादवि गुन्हयात गोपनिय माहीती प्राप्त झाल्यावरून स्टॉफसह सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीचा शोध घेवुन आरोपी नामे रूषेश चंद्रभान आत्राम वय २३ वर्ष रा आदीवासी चौक वार्ड क्र ४, विसापुर बल्लारशहा जि चंद्रपुर यास अटक करून त्याचे ताब्यातुन गजानन महाराज मंदीर प्रोफेसर कॉलनी वार्ड क्र ६, सावनेर येथील खालीलप्रमाणे माल जप्त करण्यात आला. तसेच सदर गुन्हयातील आरोपीचा शोध घेवुन आरोपी निष्पन्न करून अवघ्या १२ तासाचे आत अटक करून आरोपी कडुन ०३ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणलेले आहे.

**जप्त माल :–**

१. दानपेटीतील चोरी गेलेले नोटा व चिल्लर पैसे असे एकुण २३,६०४/–रू
२. होम थेटर कि ५०००/– रू
३. चांदीचे ०२ जोड मनगटे व पायपट्टी कि १५००/–रू
४. नगदी ११००/–रू असा एकुण ३१२०४/– रू चा मुद्देमाल

**अटक आरोपी नाव :–** रूषेश चंद्रभान आत्राम वय २३ वर्ष रा आदीवासी चौक वार्ड क्र ४, विसापुर बल्लारशहा जि चंद्रपुर

उघडकीस आलेले गुन्हे :– पोस्टे सावनेर अप क्र ६४६/२३ कलम ४५७,३८० भादवि,
अप क्र ६३२/२३ कलम ४५४,४५७,३८० भादवि,

सदरची कारवाई मा. श्री विशाल आनंद (पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण), मा. श्री संदीप पखाले अपर पोलीस अधिक्षक, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री रविंद्र मानकर, पोस्टे सावनेर, पोलीस उपनिरीक्षक श्री विक्की लोखंडे, डिबी पथकातील कर्मचारी पोहवा सुरेन्द्र वासनिक, अतुल खोडनकर, पोलीस नाईक रविंद्र चटप, रवी मेश्राम, पोलीस अंमलदार सचिन लोणारे, दाउद मोहम्मद, यांचे पथकाने केली आहे.